**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः05.03.2025** **वारःबुधवार**

---

**ठळक बातम्या**

• मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा राज्यपालांनी स्वीकारला

• अबू आझमी यांच्यावर कारवाई करण्याच्या मागणीवरून विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात सभासद आक्रमक,

• पुणे महानगरपालिकेचं 2025-26 वर्षासाठीचं 12618 कोटी रुपयांचं अंदाजपत्रक स्थायी समितीला सादर

• आत्मनिर्भर भारताचं लक्ष्य समोर ठेवून वेगवान सुधारणा करण्यावर भर असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

आणि

• आय सी सी चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत ऑस्ट्रेलियाला नमवत भारताची अंतिम फेरीत धडक

**मुंडे राजीनामा**

राज्याचे अन्न, नागरी पुरवठा आणि सार्वजनिक वितरण मंत्री धनंजय मुंडे यांनी काल आपला राजीनामा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सादर केला. हा राजीनामा राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी स्वीकारला आहे. नैतिकतेला धरून आणि प्रकृती अस्वास्थ्याच्या कारणावरून राजीनामा देत असल्याचं मुंडे यांनी समाजमाध्यमावरील संदेशात सांगितलं. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातल्या आरोपींशी संबंध असल्याचे आरोप करून विरोधकांनी मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली होती. धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात न देता थेट प्रसारमाध्यमांना दिली. हा सभागृहाचा अपमान असल्याचं सांगत याप्रकरणी मुख्यमंत्र्यांवर हक्कभंग प्रस्ताव आणण्याचा इशारा काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी दिला आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात सरकारचा कोणताही हस्तक्षेप नसून मुंडे यांनी नैतिकतेला धरून राजीनामा दिला असल्याचं राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून सांगण्यात आलं. धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिल्यानंतर बीड जिल्ह्यातला तणाव कमी झाला असला, तरी काल पुकारण्यात आलेला जिल्हा बंद मात्र कायम ठेवण्यात आला. जिल्ह्यात बंदला प्रतिसाद मिळाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**अबू आझमी-विधीमंडळ**

औरंगजेबाचं उदात्तीकारण करणारं वक्तव्य करणारे समाजवादी पक्षाचे आमदार  अबू आझमी यांच्यावर कारवाई करून देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा, या मागणीवरून काल विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहात सत्ताधारी आक्रमक झाले. विरोधकांनी देखील  ही मागणी उचलून धरल्यामुळे काल दोन्ही सभागृहात गदारोळ झाला. त्यामुळे सभागृहांचं कामकाज प्रथम वारंवार आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. अबू आझमी यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे विधानसभेत आणि विधानपरिषदेतही म्हणाले. लोकभावनेचा विचार करून सरकारनं आझमी यांच्यावर कारवाई करावी असे निर्देश विधानपरिषदेत सभापती राम शिंदे यांनी दिले. औरंगजेबाबद्दलच्या विधानांमुळे जनतेच्या भावना दुखावल्या असल्याची तक्रार खासदार नरेश म्हस्के यांनी केल्यानंतर आझमी यांच्या विरोधात ठाण्यात वागळे इस्टेट  पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. दरम्यान राज्यात काल ठिकठिकाणी आंदोलनं करून आझमी यांचा निषेध करण्यात आला. आपल्या वक्तव्यामुळे कोणाच्या भावना दुखावल्या असतील, तर आपण आपलं विधान मागे घेत आहोत असं आझमी यांनी संगितलं.

**विरोधी पक्षनेतेपद**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं विधानसभेतल्या विरोधी पक्षनेते पदावर दावा सांगितला आहे. आमदार भास्कर जाधव यांची नेमणूक करावी असं पत्र पक्षानं काल विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना दिलं. विरोधी पक्षनेते पद, महाविकास आघाडीतल्या इतर पक्षांसोबत अडीच - अडीच  वर्षांसाठी वाटून देण्याचा कुठलाही प्रस्ताव नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

**सूर्यवंशी प्रकरण**

परभणी शहरातील संविधान प्रतिकृतीच्या अवमानाची घटना आणि सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यू प्रकरणाची चौकशी करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती विजय एल. आचलिया यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आचलिया यांनी काल परभणी शहराला भेट देऊन परिसराची पाहणी केली तसंच नवा मोंढा पोलीस स्थानकाला भेट देऊन संपूर्ण घटनेची माहिती घेतली..

**अंदाजपत्रक**

पुणे महानगरपालिकेचं 2025-26 या वर्षाचं, कोणतीही करवाढ नसलेलं, 12618 कोटीं रुपयांचं अंदाजपत्रक आयुक्त डॉ राजेंद्र भोसले यांनी काल पुण्यात स्थायी समितीला सादर केलं आणि प्रशासक म्हणून या अर्थसंकल्पाला मान्यता दिली. गेल्या वर्षीपेक्षा अंदाजपत्रकात 1 हजार 17 कोटीं रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. प्रशासक काळातील हा तिसरा अर्थसंकल्प आहे.

**या अंदाजपत्रकाविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून**

**अंदाजपत्रकात  पाणीपुरवठा विभागासाठी 1665 कोटी, मलनिस्सारणासाठी 1 431 कोटी, घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी 1142 कोटी, आरोग्य विभागासाठी 570 कोटी, नगररचना नियोजनासाठी**

**108 कोटी, वाहतूक नियोजन आणि प्रकल्पासाठी 280 कोटी, पथ विभागासाठी 1626 कोटी अशा भरीव तरतुदी करण्यात आल्या आहेत. या अंदाजपत्रकात  स्वच्छता आरोग्य आणि पायाभूत सुविधांवर भर देण्यात आला आहे. नागरिकांच्या तक्रारी सोडविण्यासाठी परिमंडळ उपायुक्त स्तरावर तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात येणार आहे. साथरोग रोखण्यासाठी मेट्रोपाॅलिटन सर्वेलन्स युनीट तयार करण्यात येणार असून यात प्रयोगशाळा आणि प्रशिक्षीत कर्मचारी असतील. समाविष्ट 34 गावांसाठी 623 कोटीची तरतूद करण्यात आली आहे. महापालिका शाळांसाठी सिस्टर स्कूल योजना राबवण्यात येणारा असून शाळेत सीसीटीव्ही बसवण्यात येणार आहेत. प्रधानमंत्री आवास योजनेतून 4 हजात 173 घरे माफक दरात देण्यात येणार आहेत. दरवर्षी पुराच्या पाण्याचा सामना करावा लागणाऱ्या सिंहगड रस्त्यावरील एकता नगरी या गृहनिर्माण सोसायटीचा पुनर्विकास केला जाणार असून त्यासाठी राज्य सरकारकडे प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. 24 तास समान पाणीपुरवठा योजना, नदी पुनरुज्जीवन प्रकल्प, मुळा-मुठा सुशोभीकरण योजना,  पंचतारांकित स्वच्छतागृहे आदी कामांसाठीही भरीव तरतूदी करण्यात आल्या आहेत**

**मोदी**

आत्मनिर्भर भारताचं लक्ष्य समोर ठेवून वेगवान सुधारणा करण्यावर भर दिला जात असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल सांगितलं. अर्थसंकल्पानंतर सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांबद्दल आयोजित वेबिनारमध्ये ते बोलत होते. एमएसएमई देशाच्या आर्थिक विकासात परिवर्तनकारी भूमिका बजावत असल्याचं पंतप्रधान म्हणाले. सुधारणा, आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि सातत्य या सर्वांचा अवलंब केल्यामुळे समावेशक विकासासाठी आमची बांधिलकी अधोरेखित होत आहे. आज अनेक देश भारताशी आर्थिक भागीदारी करण्यास उत्सुक आहेत. स्थिर धोरण आणि उत्तम व्यावसायिक वातावरण याच्या माध्यमातून विकास साधला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**साखर आयुक्त**

अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी सिध्दराम सालिमठ यांनी सोमवारी पुण्यात राज्याच्या साखर आयुक्तपदाचा पदभार स्वीकारला. साखर आयुक्त डॉक्टर कुणाल खेमनार यांची बदली झाल्यानंतर सहकार आयुक्त दीपक तावरे यांच्याकडे या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला होता.

**गडाख**

अकोल्यातल्या डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख यांच्याकडे राहुरीच्या महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कुलगुरु पदाचा अतिरिक्त पदभार देण्यात आला आहे. शिक्षण, संशोधन आणि कृषि विस्तार क्षेत्रातल्या प्रदीर्घ अनुभवामुळे गडाख यांच्याकडे ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

**हेल्पलाईन**

सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस विभागाकडून ज्येष्ठ नागरिकांसाठी हेल्पलाईन क्रमांक 7036 606060 या क्रमांकावर हेल्पलाईन सुरू करण्यात आली आहे. तक्रार नोंदवून घेण्यासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आले असून ह्या कक्षांचं कामकाज 24 तास सुरु रहाणार आहे.

**शिमगा**

रत्नागिरी जिल्ह्यात शिमगा अर्थात होळीचा उत्सव कालपासून सुरू झाला. फाल्गुन शुद्ध पंचमीला सुरू होणारा हा उत्सव गावागावांमधल्या प्रथेनुसार गुढीपाडव्यापर्यंत सुरू असतो. ग्रामदैवताच्या पालख्या नाचवण्याचा अनोखा प्रकार रत्नागिरी जिल्ह्यात पाहायला मिळतो. या वर्षी सुमारे 1400 पालख्या निघणार आहेत.

**जवान निधन**

जळगांव जिल्ह्यातील पारोळा इथले केंद्रीय राखीव पोलीस दलाचे जवान जितेंद्र चौधरी यांचं श्रीनगरमध्ये कर्तव्य बजावत असताना निधन झालं. त्यांचा पार्थिव देह पुणे मार्गे पारोळ्यात आणला जाईल; त्यानंतर आज दुपारी पारोळा इथं त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येतील.

**क्रिकेट**

आयसीसी चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य सामन्यात काल भारतानं ऑस्ट्रेलियावर चार गडी राखून मात करत या स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली. दुबईमध्ये झालेल्या या सामन्यात प्रथम फलंदाजी करत ऑस्ट्रेलियाने भारताला विजयासाठी 265 धावांचं आव्हान दिलं; या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताच्या फलंदाजांनी संयमी खेळी करत धावफलक हलता ठेवला. विराट कोहली आणि श्रेयस अय्यरने 98 धावांची भागीदारी केली. त्यानंतर के एल राहुल आणि हार्दिक पंड्याने अखेरच्या षटकांमध्ये शानदार फटकेबाजी करत भारताचा विजय सोपा केला.

तत्पूर्वी भारताच्या गोलंदाजांनीही चांगली कामगिरी करत ऑस्ट्रेलियाच्या संघाला 264 धावांवर रोखलं. 98 चेंडूत 84 धावा करणारा विराट कोहली सामनावीर ठरला. या स्पर्धेचा दुसरा सामना आज न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका संघांदरम्यान लाहोर इथं होणार आहे. या सामन्यात विजयी ठरणाऱ्या संघाबरोबर भारताची 9 मार्चला अंतिम लढत होणार आहे.

**हवामान**

हवामान-राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहील असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.